# रे.दि.मु.न ९३/२००५ मधील नि.१३७ खालील आदेश

बाळकृष्ण कोंडिबा जगताप ..... वादी

वि

पंडित आनंदराव चव्हाण ...... प्रतिवादी

१. सदरचा अर्ज प्रतिवादी नं १, २ यांनी कैफियत व दुरूस्तीसाठी दाखल केला आहे.

२. प्रतिवादी नं १, २ यांनी युक्तिवाद केले आहे की, प्रतिवादी नं,१ २ यांनी प्रति दावा Counter Claim दाखल केला आहे. सदर दाव्यामधील नि.१५ वरील कलम नं ९, १०, ११ यामधील मजकुर रद्द करून त्याखाली Counter Claim म्हणून

१ पंडित आनंदराव चव्हाण वय : ५० वर्षे, धंदा शेती,

२. मानसिंग दिनकर साळुंखे, वय:५२ वर्षे, धंदा: शेती, .... वादी

दोघे रा. भादे, ता.खंडाळा, जि.सातारा (मुळ दाव्यातील प्रतिवादी नं.१ व २)

विरूध्द

१. बाळकृष्ण कोंडिबा जगताप, वय: ७१ वर्षे, धंदा:शेती, .... प्रतिवादी

रा.भादे, ता.खंडाळा, जि.सातारा (मुळ दाव्यातील वादी)

सदर प्रति दावा Counter Claim मधील वादी नं २ ने या Counter Claim यातील प्रतिवादी (मुळ दावा वादी) यांचेविरूध्द करून त्यांनी दिनांक २१/०२/२००५ च्या साठेखताप्रमाणे दावा जमिनीतील हिश्श्याचे विक्रीची परवानगी शर्त बदली करून जुनी शर्त करून आणून त्याची विक्री राहिलेली रक्कम रू.२५,०००/— वादी नं २ कडून घेवून specific performance करून देण्यास मागणी Counter Claim मध्ये केली आहे व त्या मागणीस कसलाही बाधा येत नाही. सबब, यातील प्रतिवादी म्हणजे मुळ दाव्यातील वादी यांनी Counter Claim मधील वादी नं २ यांचेकडून खरेदीपत्राची देय राहिलेली रक्कम रू २५,०००/— त्यांचेकडून घेवून जमिन विक्रीची आवश्यक ती परवानगी आणून खरेदीपत्र (Counter Claim) मधील वादी नं २ च्या नावाने करून दयावा. तसेच, या Counter Claim मधील वादी नं १ पंडित आ.चव्हाण

यांनी वादी नं २ यांचे नावे दिनांक २१/०९/२००५ रोजी करून दिलेल्या रजिस्टर साठेखताच्या आधारे त्यांनी घेतलेली रक्कम रू ४०,०००/— या Counter Claim मधील वादी नं २ ला दयावा व सदरचा दुरूस्तीचा अर्ज मंजूर व्हावा अशी विनंती केली आहे.

३. याउलट वादीने सदर दुरूस्ती अर्जावर म्हणणे देवून युक्तिवादी केला आहे की, प्रतिवादीचा अर्ज खोटा व लबाडीचा आहे. सदर प्रतिवादीचे कथनाप्रमाणे नि.१५ चा प्रतिदावा स्विकारला गेलेला नाही. सदर दाव्यामध्ये मुद्दे निघालेले असून वादीने व प्रतिवादीने आपापले पुरावे बंद केलेले आहेत व दावा निकालावर पडलेला आहे. प्रतिवादीस specific performance ची मागणी करता येत नाही. त्यास मुदत व कारण याची बाधा येत आहे. सबब, सदरचा दुरूस्तीचा अर्ज फेटाळणेत यावा अशी विनंती केली आहे.

४. प्रतिवादी नं १ व २ यांनी सदरचा अर्ज दाव्यात कैफियत व Counter Claim मध्ये दुरूस्ती करण्यासाठी दाखल केलेला आहे. सदर कामी अर्जाचे व लिखित जबाबाची पाहणी केली असता असे दिसून येत आहे की दाव्याची सुनावणीचे काम सुरू झाले असून दावा जुना आहे. सदर दाव्यात दुरूस्ती केली तर दाव्याच्या मुळ स्वरूपात बदल होणार आहे. तसेच, दाव्याचे कामकाजही लांबणार आहे व वादी वर अन्याय होणार आहे. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश करीत आहे.

## <u>आदेश</u>

१. प्रतिवादी नं १ व २ यांचा नि.१३७ चा कैफियत व Counter Claim मध्ये दुरूस्तीचा अर्ज नामंजूर करण्यात येत आहे.

दिनांक : ०४/०७/२०१६

(ए.पी.दिवाण)
दिवाणी न्यायाधीश क.स्तर, खंडाळा.